# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३

## (सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री. विजय वडेट्टीवार, सुभाष धोटे, सुनिल केदार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील यवतमाळ जिल्ह्याच्या झरीजामनी तालुक्याच्या मुकुटबन येथील बीएस इस्पात कंपनीतर्फे ४० हजार मेट्रिक टन कोळशाचा गैरव्यवहार करण्याचे प्रकरण आढळून आलेले असणे, पांढरकवडाच्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या तक्रारीच्या आधारे जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि त्यांच्या गटाने मंगळवारी इस्पात कंपनीमध्ये पोहचून सदरहू कंपनीच्या परिसराची कसून पाहाणी करून कागदपत्रांची तपासणी केली असणे, रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या कारवाईत तक्रारीत नमूद कोळशाचे प्रमाण आणि कंपनीत उपलब्ध कोळशाच्या साठ्यात फार मोठी तफावत आढळून आल्याची बाब उघड होणे, अभिलेख्यांची जुळणी न झाल्याने कंपनीचे व्यवस्थापकाकडे याबाबतची माहिती मागितली असता सदर गटाला ते माहिती देऊ न शकणे, जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी बीएस इस्पात कंपनीला याप्रकरणी नोटीस पाठवून तात्काळ उत्तर देण्यास सांगितले असणे, या ४० हजार टन कोळशाची किंमत साधारण १६ कोटी रुपये सांगण्यात येत असून बीएस इस्पात कंपनीवर ही रक्कम हडप केल्याचा आरोप असणे, याआधी यवतमाळ एलसीबी ने वणीच्या मुकूटबन रस्त्यावर दिनांक १ सप्टेंबर, २०२२ रोजी छापा टाकून बेकायदेशीरपणे कोळसा वाहतूक करणाऱ्या आठ हायवा जप्त केलेल्या असणे व सदरहू कोळसा हा याच बीएस इस्पात कंपनीचा असल्याचे उघडकीस आले असणे, याबाबतची माहिती यवतमाळचे एसपी यांच्या माध्यमातून जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आली असल्याची माहिती प्राप्त होणे, त्याचबरोबर या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी झाल्यास बीएस इस्पात कंपनीचे असे अनेक गैरव्यवहार समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात असणे, सदर कोळसा गैरव्यवहाराची तात्काळ उच्च स्तरीय चौकशी करून दोषींना कठोर शासन करण्यासाठी शासनामार्फत अद्याप कोणतीही कारवाई करण्यात न आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र संतापाची भावना व याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री.महेश बालदी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पनवेल-उरण (जिल्हा रायगड) तालुक्यात मुंबई व इतर ठिकाणाहून मुरूम, चिखलमाती व डेब्रिजच्या गाड्या पर जिल्यातील ठेकेदार वाहतूक करीत असणे, स्थानिक प्रशासनाची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता वाहतूक करीत असलेला माल पनवेल - उरण तालुक्यात खाली केला जात असणे, उक्त विभागातील तहसीलदार, संबंधित महसूल अधिकारी व जिल्हा खणीकर्म विभाग हा चिखल, मुरूम व डेब्रिज या मालाचा खोटा पंचनामा करून दगड आहे असे दाखवून ठेकेदारांना झिरो रॉयल्टी पासेस पुरवीत असणे, झिरो रॉयल्टी पासेसमध्ये शासनाला कोणत्याही प्रकारचा महसूल न मिळता कायदेशीर पद्धतीने गौण खनिजाची वाहतूक करता येते, परंतु यामुळे शासनाचे प्रति ब्रास ६०० रुपये याप्रमाणे करोडो रुपयाचा महसुल बुडत असून वस्तू सेवा कर (GST) देखील बुडत असल्याने शासनाचे होत असलेले नुकसान, स्थानिक दगड खाण मालक व ठेकेदार रीतसर रॉयल्टी भरून प्रामाणिकपणे व्यवसाय करीत असणे, पर जिल्ह्यातील ठेकेदारांच्या या मनमानी कारभारामुळे स्थानिक क्रशर मालक व ठेकेदार यांचे नुकसान होत असल्यामुळे त्यांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होत असणे, त्यामुळे स्थानिक क्रशर मालक व ठेकेदारांमध्ये पसरलेला असंतोष, झिरो रॉयल्टी पासेसचा वापर करून गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या पर जिल्ह्यांतील ठेकेदारांवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.राम सातपुते, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"माझ्या माळशिरस मतदार संघातील पिलीव येथील महालक्ष्मी यात्रा सोलापूर जिल्ह्यातील सर्वात मोठी यात्रा असून सुमारे १५ दिवस चालणाऱ्या या यात्रेला जवळपास १५ लाख भाविक उपस्थित राहत असणे, या यात्रेमध्ये भाविकांच्या सोईसुविधांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येणे, यात्रे- दरम्यान सदर ठिकाणी दवाखाना, रुग्णवाहिका, आग्निशामक, पाणी, लाईट, रस्ते व पार्किंग व्यवस्था इत्यादी आवश्यक सुविधा पुरविण्याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, महालक्ष्मी देवस्थानच्या मालकीचे सुमारे २०० एकर क्षेत्र असून परिसरात रस्ते नसल्याने भाविकांची प्रंचड गैरसोय होणे, पिलिव महालक्ष्मी यात्रेकरिता भाविकांची प्रचंड गर्दी होत असल्यामुळे सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी या ठिकाणच्या यात्रा दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता सदर यात्रा जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या नियंत्रणात होण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बुलडाणा जिल्ह्यात खरीप हंगाम सन २०२२-२३ मध्ये ३,५७,००० शेतकऱ्यांनी पीक विमा काढलेला असणे, त्यातील २,५१,००० शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरलेले असणे, याचाच अर्थ पीक विमा काढलेल्या शेतकऱ्यांपैकी अजूनही १,०६,००० शेतकरी नुकसान होऊनही त्यांना नुकसान भरपाई मिळालेली नसणे, बुलडाणा जिल्ह्यात सततचा पाऊस व अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झालेले असून यामध्ये झालेल्या नुकसानीची माहिती ७२ तासाच्या आत देणे बंधनकारक करण्यात येणे, परंतु अनेक शेतकऱ्यांना ७२ तासाच्या आत तक्रार करावी लागते याचीच माहिती नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी तक्रारी केलेल्या नसणे, याबाबत ऑनलाईन तक्रारीबाबतचे अज्ञान, त्यातल्या त्यात अनेक शेतकरी वयोवृध्द असणे, काही शेतकऱ्यांनी खाजगी केंद्रावर तक्रारी दाखल केल्या परंतु खाजगी केंद्र वाल्यांनी पैसे घेऊनही तक्रारी दाखल न करणे, अनेक ठिकाणी लिंक नसणे, शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या परंतु ऑनलाईन दाखल न होणे, अशी अनेक कारणे असल्याने नुकसान होऊनही त्यांना नुकसान भरपाई मिळालेली नसणे, वस्तुतः बुलडाणा जिल्ह्यासह राज्यभरात सततचा पाऊस व अतिवृष्टीमुळे सर्व दूर नुकसान झालेले असणे, त्यामुळे सर्वांना झालेल्या नुकसानीप्रमाणे नुकसान भरपाई मिळणे अपेक्षित असणे, तसेच ७२ तासानंतर तक्रारी केल्याचे कारण दाखवून पीकविमा कंपनीने बुलडाणा जिल्ह्यातील पीके उभे असतानाच्या ९८७४ तर पीक काढणीच्या नंतरच्या १७५५ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पासुन अपात्र ठरविण्यात आलेले असणे, त्यामुळे तक्रारी करूनही केवळ उशिराने तक्रार दिल्याचे कारण दाखवून बुलढाणा जिल्ह्यातील जवळपास ११,६२९ नुकसान भरपाईस अपात्र केलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालेली नसणे, ज्या शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या नाही तसेच तक्रारी करूनही उशीरा तक्रार केली म्हणून अपात्र ठरविण्यात आलेल्या सर्व शेतकऱ्यांना पात्र ठरवून नुकसान भरपाई देण्याबाबत पीक विमा कंपनीकडून होणारी टाळाटाळ, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री.नारायण कुचे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील तत्कालीन, तालुका कृषी अधिकारी यांच्या विरोधात त्यांनी आर्थिक फसवणूक केली असल्याची तक्रार करण्यात आलेली असणे, तसेच त्याबाबत माननीय पालकमंत्री जालना जिल्हा, तसेच मा.जिल्हाधिकारी, जालना यांच्यासह तहसीलदार व स्थानिक लोप्रतिनिधींकडे लेखी तक्रार करण्यात आलेली असणे, तसेच सदर तक्रारदार यांची जमीन मौजे अकोला शिवारामध्ये गट नं. २२१ असणे व त्यामध्ये पॉवरग्रेडचे टॉवर व तारीचे काम चालु असणे, तसेच त्या टॉवरमुळे तक्रारदार यांचे खूप मोठ्या प्रमाणात फळझाडांचे नुकसान झालेले असणे, तसेच त्यासाठी त्यांनी तत्कालीन तालुका कृषी अधिकारी यांचेकडे मदत मागीतली असणे, तक्रारदार यांच्या फळझाडांचे मुल्यांकन काढण्यासाठी त्यांच्या शेतात उपरोक्त तालुका अधिकारी असणे, त्यांनी ३० लाख

रकमेपर्यंतच्या नुकसानभरपाईची रक्कम देण्यासाठी सुमारे १०% रकमेची मागणी केली असणे, त्यामुळे नाईलाजास्तव तक्रारदार शेतकरी यांनी तत्कालीन कृषी अधिकारी यांना १० टक्के ३ लाख रुपये रोख स्वरूपात दिलेले असणे, परंतु सदर शेतकऱ्यांचे झालेले नुकसान यांचे मूल्यमापन योग्य झाले नसल्याने प्रत्यक्षात बाधित शेतकरी, श्री. काकडे यांना अल्पस्वरुपात मदत मिळाली असणे, तत्कालीन तालुका कृषी अधिकारी यांनी १०% रक्कम शेतकरी यांचेकडून घेऊन त्यांची आर्थिक फसवणूक केली असणे, परिणामी पिडीत शेतकरी यांनी तत्कालीन तालुका कृषी अधिकारी यांचेकडे पाठपुरावा करून रक्कम मिळावी यासाठी अनेकदा भेटून विनंती केली असणे, परंतु त्यांनी शेतकरी काकडे यांनाच शिवीगाळ करून अपमानित करून रक्कम देण्यासाठी नकार दिलेला असणे, परिणामी उपरोक्त पिडीत शेतकरी यांच्याद्वारे स्थानिक प्रशासनाला सदर प्रकरणी न्याय होण्यासाठी तक्रार करण्यात आलेली असणे, मात्र अद्यापही गरीब शेतकरी श्री.अशोक काकडे यांना कोणताही न्याय मिळाला नसल्याने शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची भावना पसरलेली असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री.दिपक चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना मोठया प्रमाणात राबविण्यात येत असणे, गोरगरिबांना या योजनेचा संपूर्ण लाभ मिळणे अपेक्षित असणे, नुकतेच राज्य शासनाने मदतीची रक्कम रुपये दीड लाखावरुन रुपये पाच लाख केलेली असणे, मात्र अद्यापही क्षेत्रीय स्तरावर त्याची अंमलबजावणी होत नसणे, या योजनेमध्ये सुरवातीस साधारणत: ९५० आजारांचा समावेश असणे, नव्याने आजारांची संख्या वाढवून १९०० च्या वर आजारांना या योजनेतून मदत मिळत असणे, मात्र समाविष्ट आजारांविषयी अद्यापही संभ्रम असणे, काही आजारांना अद्यापही मदत मिळत नसणे, सर्पदंश झाल्यानंतर जर व्हेंटीलेटर लावला असेल तरच वैद्यकीय मदत मिळत असणे, अपेंडीक्ससारख्या आजारात किती लांबीचे अपेंडीक्स आहे यावर मदत ठरत असणे, एकंदरीत अशा प्रकारच्या आजारांमध्ये योजना राबवितांना अनेक शंका उपस्थित होत असणे, या योजनेच्या मदतीची घोषणा चांगली असली तरी वेळेवर मदत मिळत नसणे, काही प्रकरणात कागदपत्रांसाठी रुग्णालये व डॉक्टरांकडून पिळवणूक होत असणे, खाजगी रुग्णालये व योजनेतील रुग्णालये यांचे वापरलेल्या वैद्यकीय साधनांच्या देयकामध्ये फरक असणे, एकंदरित योजनेच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करुन नव्याने परीपूर्ण शासन निर्णय काढण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री.अजय चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

" मुंबईतील वरळी, नायगाव येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासास परवानगी दिलेली असून पुनर्विकासाचे काम सुरु असणे, तथापी शिवडी येथील सुमारे साडेचार एकर जागेवर

असणाऱ्या १२ चाळींच्या पुर्नविकासास अद्याप मान्यता दिलेली नसणे, सदरच्या चाळी या १०० वर्षे जुन्या असून त्या मोडकळीस आलेल्या असल्याने कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, त्यामुळे तेथील रहिवाश्यांमध्ये पसरलेली असुरक्षितता, सदरची बाब ही केंद्र शासनाच्या अखत्यारित येत असून म्हाडाच्या पॅनलवर असणारे वास्तुविशारद मिलींद सांबारे यांनी सुसाध्यता अहवाल (फिजीबल रिपोर्ट) तयार केला असून तो म्हाडाला सादर करण्यात आलेला असणे, म्हाडाने सदरचा अहवाल मुंबई पोर्ट ट्रस्टला सादर केला असून पुढील कार्यवाहीसाठी तो केंद्र सरकारच्या जलवाहतूक मंत्रालयाकडे मंजूरीसाठी प्रलंबित असणे, मागील शासनाने यासंदर्भात जमीन राज्य सरकारकडे हस्तांतरीत करणे आणि त्याचा मोबदला राज्य सरकार देण्यास तयार असल्याचा प्रस्ताव नौवहन विभागाला पाठविण्यात आलेला असणे, उक्त दोन्ही प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी प्रलंबित असून त्यास मंजूरी देणे आवश्यक असतांनाही केंद्र शासनाने उक्त प्रस्ताव प्रलंबित ठेवणे, त्यामुळे शिवडी येथील बीडीडी चाळीतील रहिवाश्यांमध्ये तीव्र नैराश्याचे वातवरण पसरलेले असणे, राज्य शासनाने यामध्ये हस्तक्षेप करुन तात्काळ उक्त दोन्ही प्रस्तावास मंजूरी मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली असणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन रहिवाश्यांना दिलासा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री.सुनील राणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गिरणी कामगारांच्या पात्र, अपात्रतेबाबत तसेच अनेक गिरणी कामगारांना वेळेत घर मिळत नसलेबाबत वा त्यांच्या वारसांना घर देण्याबाबत वेळोवेळी प्रश्न निर्माण होत असणे, मुंबईमध्ये असलेल्या एन.टी.सी. गिरण्यांच्या जमिनीवर असलेल्या चाळींचा पुर्नविकास तसेच १/३ मिलची जागा म्हाडाकडे वर्ग करणेबाबत कार्यवाही करण्यास विलंब होणे, अनेक गिरण्यांच्या जमिनींचा ताबा म्हाडाकडे दिलेला नसणे, महानगरपालिका १/३ चे वर्गीकरण करून उपलब्ध असलेल्या जागांचे एकत्रीकरण करून India United Mill No. २/३ मध्ये म्युझियम उभारत असताना अंदाजे ४४,००० चौ.मि. च्या जागेवर (हेरिटेज च्या माध्यमातून) आणि उरलेली अंदाजे २०,००० ते २२,००० चौ.मि. जमीन म्हाडाला देऊन तिथे कामगारांना घरे देण्याबाबत (अंदाजे गिरण्यांची जमीन (India United Mill No. २/३) १५ एकर) होणाऱ्या कार्यवाहीस विलंब होणे, बॉम्बे डाईंग, स्प्रिंग आणि श्रीनिवास मिल येथील घरांचे गतिमानतेने चावी वाटप सुरू झालेले असणे, स्टँप ड्युटी म्हाडा कार्यालयातच भरणे, कामगाराने उशीरा भरलेल्या रकमेवरचे व्याज माफ करणे, घराचा ताबा मिळाल्यानंतरच देखभाल व दुरुस्तीचा खर्च आकारण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी आणलेली पारदर्शकता तसेच नवीन सुधारणा व निर्णय यामुळे कामगारांना दिलासा मिळणे, मा.मुख्यमंत्री यांच्याकडून संनियंत्रण समितीच्या माध्यमातून मुंबईमध्येच गिरण्यांच्या उपलब्ध असलेल्या जमिनीवर शक्य होईल तेवढी घरे गतीने बांधकाम सुरू करण्याबाबत निर्देश देणे, मुंबईबाहेर म्हणजेच ठाणे, पनवेल, कल्याण, येथील तयार असलेल्या घरांबाबत वितरण व्यवस्था,

पात्रता निश्चित करणे, प्रत्यक्ष ताबा व चावी वाटप करणे तसेच प्रतिक्षा यादीमध्येसुद्धा मर्यादित वेळेत निर्णय घेणे अपेक्षित असणे, काही तयार असलेली घरे India Bulls कडून एमएमआरडीए ला हस्तांतरीत करून कोन-पनवेल प्रमाणे साधारण २५०० उपलब्ध घरे गिरणी कामगारांना वितरीत करण्याची कारवाई प्रलंबित असणे, प्रलंबित असलेली रांजगोळी, कोल्हे (पनवेल) रायचूर येथील २५२१ घरांची सोडत प्रलंबित असणे, अनेक गिरणी कामगार वास्तव्याला पश्चिम महाराष्ट्रात असल्यामुळे तसेच वयोवृध्द असल्यामुळे मुंबई येथे येणे शक्य नसणे, त्यामुळे सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर व इतर ठिकाणी त्यांना घरे मिळण्याची होत असलेली मागणी, म्हाडा विभाग, कामगार आयुक्तालय व महानगरपालिकांमध्ये समन्वय करून विशिष्ट कालावधीमध्ये योजना कार्यान्वित करून घरांच्या बाबतीत कामगारांना दिलासा मिळेल व गतिमानतेने अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या विषयाला न्याय देण्याची आवश्यकता, सुमारे १,७४,००० गिरणी कामगारांची पात्रता निश्चित करणेबाबत एक मोठी मोहीम शासनामार्फत राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ)** तारांकित प्रश्न

**(ब)** तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

**महिला व बाल विकास मंत्री** : "सिरोंचा (जि. गडचिरोली) तालुक्यात "माझी कन्या भाग्यश्री" योजनेसाठी अनुदान देण्याबाबत" या विषयावरील श्री. रईस शेख, वि.स.स. यांच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ४८८२८ च्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : **(क)** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री** : **(क)** कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चोवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **उद्योग मंत्री** : **(क)** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अठ्ठावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षाचा अनुक्रमे चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन** : **स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार** : **औचित्याचे मुद्दे (असल्यास)**

**पाच** : **शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत घोषणा**

**सहा** : **लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्रीमती प्रणिती शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचा लाभ मिळण्याकरिता सदर योजने करिता उत्पन्नाची मर्यादा वार्षिक रुपये २१०००/- इतकी असणे, लाभार्थ्यांना रुपये २१,०००/- उत्पन्नाचा दाखला मिळविण्यासाठी सर्कलमार्फत चौकशी केली असता दाखला मिळण्यास अत्यंत अडचणी येत असल्याने दाखला न दिल्यामुळे लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजने करिता अपात्र ठरविण्यात येत

असणे नागरिक या योजनेपासून वंचित राहत असल्यामुळे या योजनेतील उत्पन्नाची मर्यादा वाढवून रुपये ५१ हजार इतकी वाढविण्याची आवश्यकता असणे तसेच संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना त्यांनी वर्षातुन एकदा उत्पना दाखला सादर केल्यानंतर त्यांना लगेच दुसऱ्या वर्षी उत्पन्न दाखला सादर करण्याची जाचक अटीमुळे त्यांना होणारा त्रास, त्याचप्रमाणे सोलापूर येथील सेतू कार्यालय दिनांक १ एप्रिल २०२३ पासून अचानक बंद करण्यात आल्यामुळे सोलापूर शहरातील बहुसंख्य विद्यार्थी व नागरिकांना शैक्षणिक व इतर बाबींसाठी लागणारे उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, रहिवासी दाखला इत्यादी दाखले काढण्यासाठी सेतू कार्यालयात अडचणी निर्माण होत असणे, सोलापूर सेतू कार्यालय टेंडर दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी संपली असून त्याआधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जुन्या कंत्राटदारास मुदतवाढ देणे अथवा नवीन टेंडर काढणे गरजेचे असणे, परंतु याबाबत कार्यवाही केली नसल्याने सोलापूर जिल्हा सेतू कार्यालय बंद झाल्याने विद्यार्थी व नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून सोलापूर जिल्ह्यातील सेतू कार्यालय सुरू करण्यासाठी व संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेसाठी उत्पन्नाची मर्यादा रुपये ५१ हजार पर्यंत वाढविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(२) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक १० जुलै, २०२३ रोजी तत्कालीन खनिकर्म मंत्री यांनी सुमारे रुपये २०० कोटीच्या विकास कामांना ग्रामसभेचा ठराव, अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता, जिल्हाधिकाऱ्यांचा प्रस्ताव नसतांना महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी अधिनियम, २००१ नुसार नियमबाह्य व अवैध पध्दतीने प्रशासकीय मंजूरी देणे, उपरोक्त कायदा दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी निरसित झाला असताना व्याजाच्या रकमेतून खनिज विकास निधीच्या व खनिज धोरणांशी विसंगत कामे मंजूर करण्यात येणे, उपरोक्त निधी वाटप करतांना खाणबाधित ग्रामपंचायतींना व परिसराला डावलून खनिकर्म होत नसलेल्या व नियमात तरतूद नसलेल्या कामांना बेकायदेशीर पध्दतीने प्रशासकीय मंजूरी देऊन खाणबाधित क्षेत्रावर अन्याय करणे, खनिज धोरणाअंतर्गत खनिज विकास निधीतून दिनांक १ ऑगस्ट, २०१२ च्या कार्यपध्दतीला डावलून वित्त विभागाने याबाबत मान्यता देऊ नये असे नमूद केल्यानंतरही मान्यता दिलेल्या या कामामुळे खाणबाधित क्षेत्रातील लोकप्रतिनिधींमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, उपरोक्त कायदा निरसित झाल्यानंतर विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता गैरमार्गाने मंजूर केलेल्या कामांना शासनाने तात्काळ स्थगिती देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयातील परि क्र.२ मध्ये नमूद "पदोन्नतीसाठीची (कक्ष अधिकारी) विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्याकरीता कर्मचाऱ्याने त्या पदावर (सहायक कक्ष अधिकारी) किमान १५ वर्ष सेवा पुर्ण करणे अनिवार्य राहील" ही महत्वाची अट दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ च्या शुध्दीपत्रकान्वये वगळून त्याऐवजी पदोन्नतीसाठीची (कक्ष अधिकारी) विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्याकरीता कर्मचाऱ्याने शासन सेवेत १५ वर्ष सेवा पुर्ण करणे ही अट समाविष्ट करणे, यामुळे, कक्ष अधिकारी पदावर काम करण्याकरीता सहायक कक्ष अधिकारी या पदावरील किमान / अनिवार्य सेवा करण्याची तरतूद नष्ट होणे, त्यामुळे कक्ष अधिकारी यासारख्या मंत्रालयातील अत्यंत महत्वाच्या पदावर काम करण्याकरीता कार्यक्षम तसेच सदर पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांना न्याय देण्याकरीता पुरेसे सक्षम आणि पात्र उमेदवाराची पडताळणी करणे हा पदोन्नतीपूर्वीच्या आवश्यक असणारी विभागीय परिक्षा व निम्न पदाची सेवाप्रवेशोत्तर परिक्षा पास न होणाऱ्या निम्नस्तरावरील शिपाई, लिपीक, सहायक कक्ष अधिकारी पदावरील कर्मचारी यांना केवळ शासन सेवेत १५ वर्षाचा अनुभव असल्यामुळे सदर पदावर पदोन्नतीच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट करणे ही बाब न्यायोचित नसणे, याउलट सरळसेवेने सहायक कक्ष अधिकारी पदावर नियुक्त होवून सदर पदावर ५ वर्ष निरंतर सेवा करून ४ वर्षांत ३ संधीत सदर पदाची सेवाप्रवेशोत्तर परिक्षा तसेच कक्ष अधिकारी पदासाठीची विभागीय परिक्षा विहीत वेळेत/संधीत उतीर्ण झाल्याशिवाय त्यांचा कक्ष अधिकारी पदोन्नतीसाठीच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट न होणे तसेच सुट मिळालेल्या सहायक कक्ष अधिकाऱ्यांमुळे सरळसेवेतील सहायक कक्ष अधिकारी यांना पदोन्नती मिळण्यास विलंब होणे, एकुणच पुढील पदोन्नतीच्या संधी कमी होणे इ. बाबी अन्यायकारक असणे, याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ चे शुध्दीपत्रक रद्द करण्यात येवून यापुर्वीचा दिनांक १ मार्च, २०१८ चा शासन निर्णय लागू करावा याअनुषंगाने दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी शासनास सादर केलेल्या निवेदनावर शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) ॲड.राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील ५१ महसुली गावांचा समावेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत झाल्याने औद्योगिकीकरण व नागरिकीकरण झपाट्याने वाढत असणे, वाढत्या औद्योगिकीकरण व नागरिकीकरणामुळे, मोठ्या

प्रमाणावर परप्रांतीय कामगारांचे वास्त्यव्य देखील या ठिकाणी असणे, औद्योगिक क्षेत्रात केमिकलचे कारखाने असल्याने वारंवार अपघात देखील होत असणे, यवत पोलीस स्टेशनअंतर्गत पाटस दूरक्षेत्र कार्यरत असणे, यवत व दौंड या दोन्ही पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामुळे व इतर तालुक्याच्या तुलनेत दौंड तालुक्यात फक्त दोनच पोलीस स्टेशन असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण पडत असणे, यवत (ता. दौंड) येथील पोलीस ठाण्याचे विभाजन करून पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली असणे, याबाबत नवीन पोलीस स्टेशन प्रस्तावित असणे, पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या सुधारित आकृतीबंधामध्ये पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन निर्माण करणेबाबतच्या प्रस्तावाचा समावेश करण्यात आलेला असणे, हा सुधारित आकृतीबंध वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून, वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल असे शासनाकडून माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये कळविण्यात येऊन देखील अद्यापही कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, यादरम्यान सन २०२० पासून पुणे जिल्ह्यात ५ ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन्स व एका ठिकाणी पोलीस उपमुख्यालय मंजूर करण्यात आलेले असणे, दौंड पोलीस स्टेशन हद्दीतील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी गोपाळवाडी परिसरात पोलीस चौकी सुरू करण्याची मागणी देखील अनेक दिवसांपासून प्रलंबित असणे, तसेच दौंड व यवत या दोन्ही पोलीस स्टेशनच्या इमारती खूप जुन्या झालेल्या असून मोडकळीस आलेल्या असणे, दौंड उपविभागीय अधिकारी (DYSP) कार्यालयासाठी असलेली जागा व इमारत अपूरी पडत असणे, पोलीस कर्मचारी व अधिकारी यांची निवासस्थाने पडलेली असून, अनेक दिवसांपासून वापरात नसल्याने त्याठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले असणे, या सर्व इमारतींची पुनर्बांधणी करणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यक निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनदरबारी दिनांक ७ जुलै, २०२३ रोजी सादर करण्यात आलेला असणे, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ व ७ ची समादेशक कार्यालय, गट भांडार, दवाखाना व बराक अशी अनेक प्रशासकीय इमारतींची बांधकामे प्रलंबित असणे, सदर बांधकाम प्रस्तावास मान्यता मिळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री.रत्नाकर गुट्टे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात परभणी जिल्ह्यातील तत्कालिन पोलीस अधिक्षक यांनी पोलीस कल्याण निधीमध्ये मोठा गैरव्यवहार केल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना माहे डिसेंबर, २०२२ मध्ये देणे, शासकीय कार्यालयाकरिता साहित्य खरेदी करीत असताना जी.ई.एम. पोर्टलमधून खरेदी करणे

अपेक्षित असणे, परंतु तत्कालीन पोलीस अधिक्षकांनी असे न करता टि.व्ही. आणि संगणक खरेदी करता वेल्फेअर फंडाचा वापर करून चुकीचा पायंडा पाडलेला असणे, सदर खरेदीचे देयके अथवा नोंद कोणत्याही रेकॉर्डवर घेण्यात आलेली नसणे व त्यासाठी शासकीय प्रक्रीयेचा अवलंब केलेला नसणे, त्यामुळे शासकीय खरेदी करताना नोटशीट बनवावी लागत असणे, परंतु तसेही करता आलेले नसणे, त्यामुळे खरेदी करण्यात आलेले टि.व्ही. त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात येणे, पोलीस कर्मचारी व अधिका-यांच्या महत्वाच्या (उदा. अपघात, आजारपण, अपघाती मृत्यू) कार्यासाठी वापरला जाणाऱ्या पोलीस कल्याण निधीचा वापर स्वतःसाठीच केलेला असणे, या कामासाठी वेल्फेअर फंडासाठी लाखो रुपयांची एफडी मोडली असणे, याचे सुध्दा रेकॉर्ड उपलब्ध नसणे, तसेच पोलीस वेल्फेअर फंडातून कोट्यवधी रुपयांचा निधी स्वतःसाठी व स्वतःच्या निवासस्थानी खर्च केलेला असणे, त्याचबरोबर कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी बनविण्यात आलेल्या नवीन मंगल कार्यालयासाठी माती, रेती, सिमेंट, विटा खरेदी केले असे दाखवले असणे व त्याची लाखो रुपयांची देयके अदा केली असणे, परंतु हे त्यांच्या अधिकार क्षेत्रातील पोलीस स्टेशनकडून सदर बांधकाम साहित्य मोफत घेतलेले असणे याची चौकशी होणे गरजेचे असणे, तसेच गुन्ह्याची माहिती भरणेसाठी सीआयडी क्रॉईम मार्फत सी.सी.टी.एन.एस. प्रणाली चालवली जाणे, त्याच्यासाठीसुध्दा ८ लक्ष रुपयांचा खर्च तत्कालिन पोलीस अधिक्षकांनी केला असणे, मात्र संपुर्ण महाराष्ट्रामध्ये सी.सी.टी.एन.एस. साठी कोठेही ८ रुपयांचा सुध्दा खर्च केलेला नसताना परभणी जिल्ह्यात लाखो रुपयांचा खर्च करणे, त्यामुळे याबाबतीत राज्य सरकारने सखोल विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पनवेल (जि. रायगड) शहरातील विज वाहक यंत्रणा अद्यापही जुन्या असून जवळपास ३ किलोमीटरच्या क्षेत्रातील विज वाहिन्या भुमीगत नसल्यामुळे नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत असणे, विज वाहिन्यांवर पक्षी बसून वीज वाहिन्या बंद पडत असणे, पावसाळयात शॉर्ट सर्किटमुळे विज पुरवठा वारंवार खंडीत होत असणे, २५ ते ३० वर्षापूर्वी टाकण्यात आलेल्या विज वाहिन्या एकाच पोलवर उच्चदाब व लघुदाब अशा प्रकारात असल्यामुळे वीज कर्मचाऱ्यास ग्राहकांची तक्रार सोडविताना दोन्ही वाहिन्या बंद कराव्या लागत असल्यामुळे ग्राहकांना वीज पुरवठा सुरळीत होत नसणे, कोकण आपत्ती सौमिकरण प्रकल्पाअंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महावितरण कंपनीच्या ओव्हरहेड विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याबाबत मा.ऊर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पनवेल महानगरपालिकेने निवेदनाद्वारे मागणी केली असणे, महावितरण कंपनीने पनवेल नगरपरिषद अस्तित्वात असताना नगरपरिषद हद्दीतील ओव्हरहेड विद्युत वाहिन्या भूमिगत केबलमध्ये रूपांतर करण्यासाठी जवळपास

१८० कोटी रूपये अंदाजपत्रक तयार करून सदर कामे पनवेल महानगरपालिकेने १.३ टक्के सुपरव्हिजन चार्जेस भरून स्व:खर्चाने करणेबाबत कळविले असणे, सदर अंदाजपत्रकात पनवेल महानगरपालिकेचे संपूर्ण कार्यक्षेत्र अंतर्भूत नसणे, महानगरपालिकेच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात ओव्हरहेड विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत मा. ऊर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या दालनात दिनांक ५ जून, २०१८ रोजी मा.प्रधान सचिव, मा.व्यवस्थापकीय संचालक - महावितरण कंपनी व महापौर यांच्या उपस्थितीत बैठक झाली असणे, परंतू जवळपास चार ते पाच वर्षाचा कालावधी होऊनसुध्दा ओव्हरहेड विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध होत नसल्यामुळे विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याची कामे अद्याप सुरू झाली नसणे, विज वाहिन्या भूमीगत करण्यासाठी कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेल्या प्रचंड असंतोषाबाबत पनवेल महानगरपालिकेच्या संपूर्ण कार्यक्षेत्रातील ओव्हरहेड विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यासाठी तातडीने आवश्यक तो निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री. जयकुमार गोरे, ॲड. राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यामध्ये मागासवर्गीय समाजाच्या जमिनी बेकायदेशीररीत्या हस्तांतरित करून मागासवर्गीय शेतकऱ्यांचेवर अन्याय करण्याचे प्रकार राज्यभर मोठ्या प्रमाणात होत असणे, मौजे रावेत, जि.पुणे येथील जुना स.नं.३३ व ३४ चे नविन स.नं.७२ व ७३ ही जमीन मिळकत महार वतन (६ब) ची असणे, महार वतन जमीनीस कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील तरतूदीनूसार नविन शर्तीवरील जमीनी वतन/इनाम जमीनी/सिलींग कायद्याखाली वाटप केलेल्या नवीन शर्तीवरील कायद्याखालील वाब्प केलेल्या जमीनींना कुळवहिवाट कलम ३१ ते ३२ र ३३ अ, ब, क आणी ४३ च्या तरतुदी लागू होत नसणे, तरीही रावेत जि.पुणे येथील स.नं.७२ व ७३ या जमीनीस उपविभागीय अधिकारी मावळ जि.पुणे यांनी आदेश क्र. ४३/SR/३५/२००७ अन्वये विक्री परवानगी बेकायदेशीरपणे देऊन जमिनीची विक्री करणे, सदरच्या संपूर्ण प्रकाराबाबत व कायदेशीरतेबाबत अन्याय झालेल्या शेतकऱ्यांनी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, दिल्ली यांचेकडे तक्रारी दाखल केलेल्या असणे, यामध्ये आयोगाने उक्त जमीन ही महार वतन असल्याबाबत जाहीर केलेले असणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

(८) **श्री. राजेश पाडवी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुल असून स्वातंत्र्य लढ्यात ब्रिटिशांविरुद्ध लढा देत बलिदान दिल्याचा नंदुरबार जिल्ह्याचा क्रांतिकारी इतिहास असणे, मुख्य नंदुरबार

जिल्ह्यातील तळोदा तालुक्यात गुलाम महाराज व रामदास महाराज यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देत ब्रिटिशांचा विरुद्ध अनेक लढायांचे नेतृत्व करणाऱ्या आदिवासी क्रांतिकाराकांचा जाज्वल्य इतिहास उपलब्ध असणे, तळोदा तालुक्यातील रावळापाणी येथे सन १९४३ मध्ये आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांवर ब्रिटिश राजवटीने बेछुट गोळीबार करत महाभयंकर "रावळापाणी हत्याकांड" घडवलेले असणे, जालियनवाला बाग हत्याकांडाप्रमाणे ब्रिटिश सैन्याने रावळापाणी गावावर हल्ला केलेला असणे, त्यामध्ये शेकडो निष्पाप आदिवासी मारले गेलेले असणे, हे हत्याकांड ब्रिटिशांच्या दडपशाहीचे क्रूर कृत्य असणे, या घटनेचा आजही सरकारी संकेतस्थळावर पुरावा प्रसिद्ध असणे, गुलाम महाराज, रामदास महाराज व रावळापाणी हत्याकांड स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील महत्वाचे भाग असणे, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींना त्यांचा अभिमान असणे, नंदुरबार जिल्ह्याला आदिवासी वीरांचा स्वातंत्र्याच्या लढ्यातील धैर्याचा व त्यागाचा इतिहास प्राप्त असणे, मात्र रावळापाणी आदिवासी गावात आजही मूलभूत सुविधांचा अभाव असणे, आदिवासी पर्यटनाचा एक भाग म्हणून गुलाम महाराजांच्या स्मारकाला चालना दिल्यास परिसरातील आजूबाजूचा मोठा भाग विकसित होणार असणे, यासंदर्भात गुलाम महाराज यांच्या "आप की जय" परिवारातील सदस्यांची अनेक वर्षापासूनची मागणी असणे, गुलाब महाराज, रामदास महाराज व रावळापाणी हत्याकांडाचा समावेश आदिवासी वीरांच्या यादीत तसेच अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील सर्व विभागांचा समतोल शैक्षणिक विकास व्हावा असे शासनाचे धोरण आहे. मागील काही वर्षात नक्षलग्रस्त,आदिवासी, डोंगराळ, अल्पसंख्याक, भूकंपग्रस्त, सीमावती भागात महाविद्यालयीन शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प असणे. तसेच या भागातील विद्यार्थ्यांची एकूण नोंदणी गुणोत्तर (Gross Enrollment Ratio) राज्याच्या सरासरीपेक्षा कमी असल्याची बाब निदर्शनास येणे, यासाठी उक्त भागातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणातील प्रमाण वाढणे आवश्यक असून सदरहू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करून घेणे ही शैक्षणिक व सामाजिकदृष्टया राज्य शासनाची जबाबदारी असल्याने नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ, अल्पसंख्याक, भूकंपग्रस्त, सीमावर्ती भागातील महाविद्यालयांना अनुदान मंजूर करण्याची दीर्घकाळासूनची मागणी शासनस्तरावर प्रलंबित असणे, त्याचप्रमाणे मंत्रीमंडळाने दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ रोजी यापुढे शाळा. महाविद्यालये कायम विना अनुदान तत्वावर देण्याचा निर्णय घेतला असून याउपरांत दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वी कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आलेली कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण

अभ्यासक्रमांची महाविद्यालये / विद्याशाखा अनुदानावर आणण्याबाबतची मागणीदेखील दीर्घकाळापासून शासनस्तरावर प्रलंबित असणे, तसेच काही महाविद्यालयातील संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, शारीरिक शिक्षण, समाजशास्त्र विषयांना अनुदान मंजूरीबाबतची मागणी शासनस्तरावर प्रलंबित असणे, सद्यस्थितीत राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणीबाबत कार्यवाही सुरु असून यामध्ये महाविद्यालयांचा महत्वाचा सहभाग आहे, तसेच नॅक मूल्यांकनाबाबत देखील कार्यवाही करण्यात येणे, याकरिता शिक्षकीय पदे पूर्ण क्षमतेने भरलेली असणे, तथापि, शासन निर्णय दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ अन्वये दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ ची विद्यार्थी संख्या आधारभूत धरून सहा. प्राध्यापकांच्या रिक्त असणाऱ्या ८९४९ पैकी केवळ ३५८० (रिक्त पदांच्या ४०%) पदभरतीस मान्यता देणे, तथापि, उर्वरित ६०% साधारणतः ५३६९ पदांच्या पदभरतीला अद्याप मंजूरी दिलेली नसणे, दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ ते १ ऑक्टोबर, २०२२ या दरम्यानच्या कालावधीत अनेक प्राध्यापक सेवानिवृत्त झाल्याने रिक्त पदांच्या संख्येत वाढ झालेली असून दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ ची विद्यार्थी संख्या आधारभूत धरून रिक्त पदे पदभरतीस मान्यता देण्याबाबतची मागणी प्रलंबित असणे, त्याचप्रमाणे अनेक वर्षांपासून महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदभरती झालेली नसल्याने काही महाविद्यालयांमध्ये काम करण्यासाठी आवश्यक शिक्षकेत्तर कर्मचारी नसल्याची बाब निदर्शनास येणे, याबाबत पदभरती करण्याची दीर्घकाळापासूनची मागणी शासनस्तरावर प्रलंबित असणे, राज्यशासनाच्या अक्षम्य दिरंगाईमुळे विद्यार्थी व महाविद्यालयांवर झालेला विपरीत परिणाम, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **डॉ. किरण लहामटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया सुरु असणे, परंतु वसतिगृह प्रवेश क्षमता कमी असल्याने ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहावे लागणे, यामुळे विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय होणे, या सर्व बाबींचा शिक्षणावर परिणाम होत असणे, काहींना शिक्षणापासून वंचित राहावे लागत असणे, या सर्व बाबींचा विचार करून वसतिगृहांची प्रवेश क्षमता वाढवणे व नवीन वसतिगृह निर्मितीसंदर्भात शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **श्री.कैलास घाडगे पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२१ व खरीप २०२२ च्या धाराशिव जिल्हयात अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे संयुक्त

समितीमार्फत सर्वेक्षण होऊन विमा कंपनीकडून बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे वाटप करताना केंद्र सरकारच्या मार्गदर्शन सूचनांमधील परिच्छेद क्रमांक २१.५.१० नुसार चा चुकीच्या पध्दतीने वापर करुन बाधित शेतकऱ्यांना ५० टक्केच नुकसान भरपाई अदा करण्याचे नुकतेच माहे जुलै, २०२३ मध्ये उघडकीस येणे, खरीप २०२१ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत पिकात पाणी साचून राहिल्यामुळे पिकांचे नुकसान झाल्याने ३,४४,७०२ नुकसानीच्या पूर्व सूचना कंपनीला देण्यात येणे, त्यापैकी ३,०४,०८१ सोयाबीनच्या पूर्वसूचना असणे त्या प्राप्त पूर्वसूचनांपैकी २,४५,४६७ पूर्वसूचना ३/९/२१ म्हणजे क्रॉप कॅलेंडर नुसार काढणीच पंधरा दिवस आधी केंद्र सरकारच्या २१.५.१० चा लागू होत नसतानादेखील ५० टक्केच नुकसान भरपाईचे झालेले वाटप, याबाबत जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीने दिनांक ३१ मे, २०२२ रोजी बैठक घेऊन नैसर्गिक आपत्तीच्या बाबींअतंर्गत घटना घडेपर्यत झालेला उत्पादन खर्च व प्रत्यक्ष नुकसानीचे प्रमाण या बाबींचा विचार करुन नुकसान भरपाई देण्याचे अपेक्षित केले असणे, विभाग स्तरीय तक्रार निवारण समितीने जिल्हा स्तरीय समितीचा निर्णय मान्य करणे, असे असतांनाही विमा कंपनीने उर्वरित ५० टक्के नुकसान भरपाई चे वाटप न करणे, याकरिता राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे तक्रार केल्यानंतर दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी बैठक पार पडणे, परंतु अद्यापपर्यंत त्या बैठकीचे इतिवृत कायम न होणे, विमा कंपनीने फक्त जिल्हाधिकारी धाराशिव यांनी सुरु केलेल्या महसूली वसुली (आर.आर.सी) कारवाईवर मा.उच्च न्यायालयाकडून स्थगिती असतांना देखील प्रधान सचिव (कृषी) यांनी न्यायालयाच्या स्थगितीचा चुकीचा अर्थ लावून राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीचा निर्णय थांबवून शेतक-यांवर जाणीवपूर्वक अन्याय करणे, तसेच खरीप हंगाम २०२२ बाबत केंद्र सरकारच्या विमा कंपनीने धाराशिव जिल्हयातील नुकसान भरपाई वाटप करताना असमान पध्दतीने वाटप करणे, कंपनी प्रतिनिधिंकडून पंचनामाच्या वेळी शेतकऱ्यांकडून पैशांची मागणी करणे, सोयाबीन पिकाच्या ९७ टक्के पूर्वसूचना या क्रॉप कॅलेंडर नुसार कापणीच्या आधीच्या पंधरा दिवसापूर्वीच्या असूनदेखील केंद्र सरकारच्या मार्गदर्शन सूचनेतील मुददा क्रमांक २१.५.१० लागू होत नसताना देखील ५० प्रमाणेच नुकसान भरपाई वाटप करणे, जिल्हास्तरीय समिती, विभागीय समितीने दिनांक ८ मार्च, २०२३ पर्यंत पंचनाम्याच्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे आदेश असतांनादेखील अद्यापपर्यंत पंचनामे उपलब्ध करुन न देणे, विभागीय समितीचा याबाबत कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश असताना देखील अद्यापपर्यंत विमा कंपनीवर काहीच कारवाई न होणे, सदर विमा कंपनीने दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे अपील केले असूनही अद्याप राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीचे बैठक आयोजित न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून खरीप २०२१ व खरीप २०२२ च्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हक्काचा पिक विमा लाभ मिळवून देण्याबाबत शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) सर्वश्री संजयमामा शिंदे, बबनराव शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुक्यातील मौजे शेलगाव येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचे अंतर्गत असलेल्या कोरडवाहू संशोधन केंद्राचे केळ संशोधन केंद्र, शेतकरी व प्रशिक्षण केंद्र व निर्यातक्षम केळी कामगार प्रशिक्षण केंद्रामध्ये रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक (संशोधन) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी सहसंचालक फलोत्पादन कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, यांचेकडे दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी पाठविलेला असणे, मौजे शेलगाव येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग अंतर्गत तालुका बीज गुणन प्रक्षेत्र व तालुका फळरोपवाटीका असून त्याचे क्षेत्र ५५ एकर सध्या उपलब्ध असणे, या क्षेत्रामध्ये केळी संशोधन व निर्यातक्षम केळी प्रशिक्षण केंद्राची उभारणी झाल्यास सोलापूर तसेच पुणे जिल्हयातील केळी उत्पादक शेतकरी यांना मोठया प्रमाणात फायदा होणार असल्यामुळे या केळी संशोधन केंद्राला मान्यता देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१३) श्री.अमित झनक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वाशिम जिल्हा केंद्र सरकारने अकांक्षित जिल्हा म्हणून जाहीर केला असतानाही येथील रिसोड तालुक्यात औद्योगिक क्षेत्र नसणे, त्यामुळे हा तालुका शेतीवर अवलंबून असणे, शेती हंगाम संपताच रोजगार निर्मिती ठप्प पडत असणे, औद्योगिक क्षेत्र नसल्याने मोठया प्रमाणात बेराजेगारी असणे, रोजगार निर्मिती होत नसणे, येथील उच्च शिक्षीत व कुशल-अकुशल व्यक्ती नाईलाजाने रोजगारासाठी शहराकडे धाव घेत असणे, वास्तवात प्रत्येक तालुक्यात औद्योगिक वसाहत असावी असे शासनाचे २००९ पासून धोरण असणे, या तालुक्यातील ४० गावे अनेक वर्षांपासून रोजगारापासून वंचित असणे, त्यामुळे शासनाने येथे औद्योगिक क्षेत्र जाहीर करावे व येथे उद्योग उभारुन येथे रोजगार निर्मिती करावी अशी येथील जनतेची आग्रहाची मागणी असणे परंतु या मागणीवरील कारवाईस शासनाकडून होत असलेला विलंब परिणामी येथील पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना)**

**डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अनिल देशमुख, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, सुनिल केदार, अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे),**

**सर्वश्री. विकास ठाकरे, अमीन पटेल, अमित देशमुख, धिरज देशमुख, नाना पटोले, डॉ.विश्वजित कदम, डॉ.नितिन राऊत, सर्वश्री. मोहन मते, जयंत पाटील, चेतन तुपे, रविंद्र वायकर, अतुल भातखळकर, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, अजय चौधरी, दिलीप मोहिते-पाटील, अबू आजमी, जयकुमार रावल, श्रीमती श्वेता महाले, श्री. शिरीष चौधरी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील महिला व मुलींवरील अत्याचारात वाढ झालेली असून देशपातळीवर महाराष्ट्राचा महिला अत्याचारात तिसरा क्रमांक असल्याची चिंताजनक माहिती माहे जुलै, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, कामावर महिलांचा छळ होण्याच्या घटनांमध्ये १३९ टक्क्यांनी वाढ झालेली असणे, बलात्कार आणि अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये २१७ टक्क्यांनी वाढ झालेली असणे, बाललैंगिक गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक असणे, गत वर्षात सुमारे चार हजार महिला व मुली गायब असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आलेली असणे, गायब असलेल्या महिला, मुलींना शोधण्यात आलेले नसणे, महिला, मुली व बालकांवरील अत्याचारासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यास प्रशासनास आलेले अपयश, सदर प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असणे, या बेपत्ता झालेल्यांमध्ये सर्वाधिक ९८ मुली व महिलांचा समावेश दिसून येणे, त्यामुळे महिला व मुली असुरक्षित आहेत हे स्पष्ट दिसून येणे, धुळे जिल्ह्यातील एकूण १७ पोलीस ठाण्यांतर्गत दिनांक १ जानेवारी ते ५ एप्रिल, २०२३ दरम्यान एकूण २८३ जणांचा विविध कारणांमुळे आकस्मिक मृत्यू झालेला असणे, त्यापैकी २६६ जणांचे वारसदार आढळून येणे तर १७ जण बेवारस असल्याची नोंद पोलीस दप्तरी झालेली असणे, याच कालावधीत २४४ जण हरवल्याच्या तक्रारी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेल्या असणे, त्यापैकी २० जणांना शोधून काढण्यात पोलिसांना यश येणे, त्यात २ पुरुष १ महिला, ४ मुले आणि ८ मुलींचा समावेश असणे, एकूण ९८ महिला, ७७ मुली व ६८ पुरुष आणि ३३ मुले अद्यापही पोलीस दप्तरी बेपत्ता असल्याची नोंद झालेली असणे, तसेच माहे जानेवारी, २०२३ ते माहे मार्च, २०२३ या ३ महिन्यांच्या कालवधीत राज्यातील ५,६१० तरुणी व महिला बेपत्ता असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, बेपत्ता झालेल्या महिलांमध्ये १६ ते २५ या वयोगटातील ३ हजार ५९४ तरुणींचा समावेश असणे, माहे मार्च, २०२३ मध्ये सर्वाधिक २,२०० मुली व महिला बेपत्ता झाल्यापासून बेपत्ता होण्याचे प्रमाण दिवसाला सरासरी ७० असे असणे, बेपत्ता झालेल्या मुली व महिला यांचे प्रमाण पुणे येथे अधिक असून पुण्यातून २,८५८ मुली व महिला बेपत्ता झालेल्या असणे, अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव येथे राहणाऱ्या व पुण्यात अभ्यास करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत चांगले यश मिळवून अधिकारी झालेल्या दर्शना पवार यांचा मृतदेह दिनांक १८ जून, २०२३ रोजी वेल्हे पोलिस स्टेशनच्या हद्दीत आढळून येणे, पोलिसांनी याबाबत चौकशी करुन आरोपी श्री.राहुल हंडोरे याला दिनांक २२ जून, २०२३ रोजी अटक करणे, श्रीमती पवार ह्या ८ दिवसांपासून बेपत्ता झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करणे, त्यानंतर त्यांचा मृतदेह

पोलिसांना पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील राजगडाच्या पायथ्याजवळ कुजलेल्या अवस्थेत सापडणे, आरोपीने हत्या केल्याची कबुली पोलिसांकडे देणे, ही घटना ताजी असतानाच दिनांक २७ जून, २०२३ रोजी सकाळी १० वाजता पुण्यात एका तरुणीवर कोयत्याने हल्ला करुन एकतर्फी प्रेमातून तिची हत्या करण्याच्या उद्देशाने कोयता घेऊन एका तरुणाने तिच्या मागे धावून तिची हत्या करण्याचा प्रयत्न करणे व थोडक्यात तिची हत्या करण्यात अपयशी ठरल्याची घटना उघडकीस येणे, या हल्ल्यात तरुणी जखमी होणे, मात्र दोन तरुणांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून या तरुणीची जीवघेण्या हल्ल्यातून सुटका करणे, महिला-मुलींवरील अत्याचार आणि बाललैंगिक गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस होणारी वाढ, तसेच महिला बेपत्ता होण्याचे व एकतर्फी प्रेमातून महिलांवर हल्ले होण्याच्या वाढलेल्या घटनांमुळे राज्यातील जनतेत पसरलेले भितीचे वातावरण, राज्यातील महिलांना सुरक्षित ठेवण्यासाठी उक्त प्रकरणांचा काटेकोर तपास करून गुन्हेगारांना विनाविलंब कठोर शिक्षा होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२३

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी, अमीन पटेल, अमित झनक व प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त

सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्षी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियमन व सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्षी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियमन व सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी, अमीन पटेल, अमित झनक व प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्षी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियमन व

सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्षी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियमन व सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी, अमीन पटेल, अमित झनक, प्रा. वर्षा गायकवाड, श्रीमती प्रतिभा धानोरकर व श्री. सुभाष धोटे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही

सभागृहांच्या ३० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**नऊ : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, नाना पटोले, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रविंद्र वायकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय पोतनीस, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री.संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गौरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी, संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, श्री.रविंद्र धंगेकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने विधानसभेत स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे. राज्यातील नदी-

नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी महाराज नगर (औरंगाबाद) यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना नांदेड महामार्गचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड-लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्यांना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड औरंगाबाद परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पद भरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थीना शुल्क भरण्यात अडचणी येणे, केवायसीच्या नावाखाली अतिवृष्टी व पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध

विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेली खीळ, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

दहा : **श्री. भरतशेट गोगावले, ॲड. आशिष शेलार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री प्रताप सरनाईक, राम कदम, सुनिल शेळके, संजय शिरसाट, अतुल भातखळकर, यशवंत माने, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री नितेश राणे, दत्तात्रय भरणे, ज्ञानराज चौगुले, योगेश सागर, दिपक चव्हाण, सदा सरवणकर, सुनील राणे, संग्राम जगताप, डॉ. बालाजी किणीकर, ॲड. पराग अळवणी, श्री. अतुल बेनके, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री अमित साटम, दिलीप मोहिते-पाटील, सुहास कांदे, डॉ. संजय कुटे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री मंगेश कुडाळकर, गणेश नाईक, जयकुमार रावल, किशोर पाटील, प्रशांत बंब, राजेश पाटील, रमेश बोरनारे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री नितीन पवार, संजय गायकवाड, संजय केळकर, बाबासाहेब पाटील, योगश कदम, ॲड. राहूल कुल, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री महेश शिंदे, राजेंद्र पाटणी, दिलीप बनकर, प्रकाश सुर्वे, सचिन कल्याण-शेट्टी, महेंद्र थोरवे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री संतोष बांगर, रणधीर सावरकर, दिलीप लांडे, किसन कथोरे, ॲड. आशिष जैस्वाल, सर्वश्री मिहीर कोटेचा, नरेंद्र भोंडेकर, जयकुमार गोरे, चंद्रकांत निंबा पाटील, नारायण कुचे, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रशांत ठाकूर, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री हरिभाऊ बागडे, अभिमन्यू पवार, राजेश पवार, हरिष पिंपळे, राणाजगजितसिंह पाटील, सुरेश भोळे, संभाजी निलंगेकर-पाटील, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड. आकाश फुंडकर, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री किर्तीकुमार भांगडिया, गणपत गायकवाड, सर्वश्रीमती नमिता मुंदडा, मंदा म्हात्रे, सर्वश्री बबनराव लोणीकर, तान्हाजी मुटकुळे, नामदेव ससाणे, श्रीमती मोनिका राजळे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, राम सातपुते, संजय सावकारे, कॅ. आर. तमिल सेल्वन, डॉ. देवराव होळी, सर्वश्री कृष्णा गजबे, मोहन मते, तुषार राठोड, महेश लांडगे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री सुनिल कांबळे, भिमराव केराम, पराग शाह, दिलीप बोरसे, महेश चौघुले, श्रीमती आश्विनी जगताप, श्री. संजिवरेड्डी बोदकुरवार, प्रा. डॉ. अशोक उइके, सर्वश्री सुभाष देशमुख, समिर कुणावार, मदन येरावार, टेकचंद सावरकर, राजेश पाडवी, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री काशीराम पावरा, बबनराव पाचपुते, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री मंगेश चव्हाण, धनंजय गाडगीळ, दादाराव केचे, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाले, कालीदास कोळंबकर, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री संतोष दानवे, समाधान आवताडे, विजय देशमुख, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने विद्यमान शासनाने सेफ्टीचे पर्सेप्शन तयार केले असणे, अनादी काळापासून प्रत्येक राज्य व्यवस्थेमध्ये गुन्हे घडत असले तरी देशातील अन्य राज्यांच्या दृष्टीने आपला महाराष्ट्र गुन्हेगारी रोखण्यात आघाडीवर असल्याचे निदर्शनास येणे, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मागील वर्षभरात अनेक गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली असणे, २३९ लोकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येणे, अंमली पदार्थांच्या संदर्भात सन २०२२ मध्ये हजारो गुन्हे दाखल असून मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, खंडणीबाबत घडणारे गुन्हे मोठ्या प्रमाणात कमी झालेले असणे, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अँन्टी नार्कोटीक सेल तयार करण्यात आला असणे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नार्कोटीक्सच्या संदर्भात शासनाने झिरो टॉलरन्स पॉलीसी सुरु केली असणे, विद्यमान शासनाने २० हजार पोलीस भरतीची एकत्रित प्रक्रिया राबवून सर्व रिक्त पदे भरण्यासाठी पद भरतीचे निर्बंध शिथील केले असणे, पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांना वर्षाकाठी देय असलेल्या नैमितिक रजा १२ ऐवजी २० करण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीसांना सवलतीच्या दरात गृह कर्जासाठी सन २०१७ ची लोकप्रिय योजना की जी मागील शासनाने बंद केली होती ती पुन्हा लागू केली असणे, राज्यात ३४ फॉरेन्सिक लॅब तयार करण्यात आल्या असून टेक्निकल एव्हिडन्स हा ह्युमन एव्हिडन्सपेक्षा बोलका असल्याने व ह्युमन एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत असल्याने परंतु टेक्निकल एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत नसल्याने ही वस्तुस्थिती विचारात घेता फॉरेन्सिक लॅब अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य पोलीस व मुंबई पोलीस यांनी ऑपरेशन मुस्कानच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ३८ हजार बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहचविल्याचे निदर्शनास येणे, देशात हरवलेली बालके व पळून आलेली बालके शोधून त्यांच्या घरापर्यंत पोचविण्याच्या कामात मुंबई व महाराष्ट्र पोलीसांचा प्रथम क्रमांक असल्याचे निदर्शनास येणे, राजकीय व सामाजिक आंदोलनातील गुन्ह्यांमध्ये जून २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीस दलातील शिपाई, पोलीस शिपाई, चालक, सशस्त्र पोलीस संवर्गातील विविध कारणास्तव रिक्त झालेली पदे तात्काळ भरण्यास शासनाने मान्यता दिली असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सवाच्या कालावधीत ज्या गुन्ह्यांमध्ये ३१ मार्च, २०२० पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत व ज्या खटल्यांमध्ये अटी-शर्तींची पुर्तता होते असे खटले मागे घेण्याची कार्यवाही सुरू असणे, कोरोना प्रतिबंधक आदेश लागू झाल्यानंतर या आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे २१ मार्च, २०२० ते ३१ मार्च, २०२२ पर्यंत दाखल खटले मागे घेण्याची कायदेशीर कार्यवाही सुरू असणे, पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुर्नविकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, महिलांच्या समस्यांच्या संदर्भात वेगवेगळ्या जिल्ह्यात विशेष न्यायालये व जलद गती न्यायालये तयार करण्यात येणे, तसेच समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात येणे, बलात्काराच्या गुन्ह्यांबाबतीत ६० दिवसात चार्जशीट दाखल होण्याचे प्रमाण १८ टक्क्याहून वाढविण्यात पोलीस प्रशासनाला यश

आल्याचे निदर्शनास येणे, राज्यात संवेदनशील असलेल्या नक्षलग्रस्त भागाकरिता शासनाने पुरेसा निधी उपलब्ध केलेला असणे, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने शासन प्राथमिकता देत असल्याने त्यानुषंगाने कन्व्हीक्शनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न असणे, राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व मदत मिळण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक १८१ महिला हेल्पलाईन सुरू केली असणे, राज्यात स्टीट क्राईम डिटेक्शनमध्ये गुणात्मक बदल करण्याच्या दृष्टीने कमांड ॲण्ड कंट्रोल सिस्टीम प्रकर्षाने राबविण्याचा व आणखी ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सव मोकळ्या वातावरणात पार पडावे या दृष्टीने शासनाने त्यावरील निर्बंध उठविले असणे, पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी केली असणे, गणेशमुर्तीच्या उंचीवरील निर्बंध उठविले असणे, गणेशोत्सवाला कोणतेही शासकीय शुल्क भरावे लागू नये याची दक्षता घेतली असणे, ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणे, एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ दांम्पत्यांना संरक्षण इत्यादी बाबतीत शासनाने कडक धोरण राबविल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यांत कपात झाली असणे, शासनाने मागील वर्षभरात न्यायव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने प्रत्येक स्तरावर न्यायालयांची स्थापना करणे व न्यायालयांसाठी नवीन पदे निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले असणे, राज्यातील कारागृह क्षमतेपेक्षा कैद्यांची संख्या अधिक झाल्याने राज्यात वेगवेगळ्या जिल्ह्यात नवीन कारागृहे बांधण्याची कार्यवाही सुरु असणे, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कठोर उपाययोजना करण्याबाबत शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील महिला, बालके, उपेक्षित वंचित घटक व ज्येष्ठ नागरिक चिंतामुक्त व मोकळ्या वातावरणात राहत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रखर करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचारविनिमयातून नव-नवे उपक्रम राबविण्याची व त्यायोगे राज्य पोलीस दल अधिक सक्षम करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

अकरा : **सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, अनिल देशमुख, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, नाना पटोले, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रोहित पवार, रविंद्र वायकर, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. अशोक पवार, सर्वश्री अतुल बेनके, बाळासाहेब पाटील, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, संजय पोतनीस, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री. संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गोरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे,**

**सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी, संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, श्री. रविंद्र धंगेकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, परिणामी कॉलेजमधील तरुण-तरुणी मोठ्या प्रमाणात ड्रग्जच्या आहारी जाणे, डान्सबार, पब, डिस्कोथेक, ऑनलाईन गेमिंग, ऑनलाईन लोन ॲपच्या माध्यमातून राज्यातील लोकांना, विशेषत: तरुण पिढीला लुटण्याचा व आयुष्यातून उठवण्याचा सुरु असलेला बेकायदेशीर व्यवसाय, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ व क्रुरतेने गाठलेला कळस, विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार करुन हत्या करण्याची मुंबईच्या मरीन ड्राईव्ह येथील शासकीय वसतिगृहात अलिकडेच घडलेली घटना, एमपीएससी परीक्षेत राज्यात सहावी आलेली व वन परिक्षेत्र अधिकारी म्हणून निवड झालेल्या तरुणीचा काही दिवसांपूर्वी झालेला संशयास्पद मृत्यू, राज्यात एकूण १८ वर्षाखालील १४५३ मुली आणि १८ हजार १०० महिला अशा एकूण १९ हजार ५५३ मुली बेपत्ता असल्याचे गृहमंत्र्यांनी सादर केलेल्या निवेदनातून निदर्शनास येणे, महिला व मुलींवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये देशपातळीवर राज्याचा तिसरा क्रमांक असणे, बाललैंगिक गुन्ह्यात देश पातळीवर राज्याचा दुसरा क्रमांक असणे, महिलांवरील अत्याचारात २१६ टक्क्यांनी वाढ होणे, कामावर जाणाऱ्या महिलांवरील अत्याचारात १३९ टक्क्यांनी वाढ होणे, महिला अत्याचाराला आळा घालण्यासाठी आपल्या राज्याने तयार केलेला "शक्ती" कायदा केंद्र सरकारच्या स्तरावर अनेक महिन्यांपासून प्रलंबित असणे, हुंडाबळी रोखण्यात सरकारला आलेले अपयश, बारसू येथील रिफायनरी प्रकल्पविरोधी आंदोलन पोलिसी बळाने दडपण्याचा व आंदोलनकर्त्या महिलांवर लाठीचार्ज करण्याचा घडलेला निंदाजनक प्रकार, पोलिसांवर पडणारा ताण, पुणे, नागपूर, नाशिक यासारख्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया व अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरोधात करावयाच्या कारवाईत आलेली शिथिलता, मागासवर्गीय समाजावर होणारे हल्ले व त्यांच्यात वाढलेली असुरक्षिततेची भावना, जातीय/धार्मिक हिंसाचार व दंगलींचे वाढलेले प्रमाण, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर सुडबुध्दीने होणारी कारवाई, पोलीस संरक्षण देण्यात होत असलेला दुजाभाव, वारकऱ्यांवर पोलिसी लाठीचार्ज करुन संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी प्रस्थान सोहळ्याला यावर्षी लागलेले गालबोट, राज्यातील लोकसंख्येच्या तुलनेत उपलब्ध पोलिसांचे अत्यल्प प्रमाण, महाराष्ट्रात सर्व कारागृहात क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक असलेले कैदी, यामुळे कारागृहात पसरलेली बेदिली, अंमली पदार्थांची सर्रास सुरु असलेली विक्री, खारघर येथे दिनांक १६ एप्रिल, २०२३ रोजी आप्पासाहेब धर्माधिकारी महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा कार्यक्रमासाठी आलेल्या १४ श्री सदस्यांचा झालेला मृत्यू व या प्रकरणामध्ये चौकशी करण्याबद्दल होत असलेली टाळाटाळ, राज्यात अतिवृष्टी व गारपिटीने झालेल्या

नुकसानीची मदत ३० ते ४० टक्के शेतकऱ्यांना न मिळणे, पीएपी धोरण निश्चित करण्याची होत असलेली मागणी, तसेच शासनाच्या बदली धोरणात आढळून येत असलेली अनियमितता, कापूस, सोयाबीन व इतर शेतमालाच्या हमी भावात वाढ करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, अति मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या विहिरींची दुरुस्ती मग्रारोहयोमधून करण्याबाबत दिनांक १ जुलै, २०२३ रोजीचा निर्णय पुन्हा लागू करुन त्यातून ही कामे करणे, तलाठी पदासाठी आलेल्या ११ लाख ५० हजार अर्जांच्या माध्यमातून प्रत्येकी ९०० रुपयेप्रमाणे रक्कम गोळा करुन होत असलेली बेरोजगारांची लूट, मुंबईसह राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील विविध समस्या, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील अनेक मोठ्या व महत्वाकांक्षी प्रकल्पांचे रखडलेले काम, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिका आणि एमएमआरडीएने नालेसफाईवर कोट्यवधी रुपये केलेले वारेमाप खर्च, या कामासाठी असलेल्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकल्यानंतरदेखील त्यांची पुन:स्थापना करणे, मुंबईत रस्ते कामांच्या सहा हजार कोटींच्या मेगा कॉंट्रॅक्टमध्ये अनियमितता झाल्याचे उघड होणे, स्ट्रीट फर्निचरमध्ये झालेला गैरव्यवहार, मुंबई शहरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्यामुळे नागरिकांना पुरेशा पाण्यापासून वंचित रहावे लागत असणे, इतर राज्यात निकृष्ट काम केलेल्या कंपनीला गोरेगाव-मुलुंड लिंक रोडचे काम दिल्याने कंत्राटदार निवड प्रक्रियेबाबत निर्माण झालेला संशय, मुंबईच्या पूर्व उपनगरातील गोवंडी, देवनार, मानखुर्द आणि चेंबूरमधील वायुप्रदुषणाने उच्चांक गाठला असणे, मुंबईतील कोस्टल रोड प्रकल्पातील बाधितांना नुकसानभरपाई देण्यात होत असलेली अक्षम्य टाळाटाळ, धारावी पुनर्विकास प्रकल्पात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्यामुळे निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, मुंबईतील नगरसेवक निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर असलेली अनियमितता, गृहनिर्माण विषयी रखडलेले विविध प्रकल्प, म्हाडा इमारती, घरदुरुस्ती मंडळाला निधी न देणे, कारशेडसाठी जागा उपलब्ध होत नसल्याने मेट्रो ६ मार्गिकेचे काम रखडले असणे, मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचार व अनियमिततेची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची रखडलेली कामे, राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रातील विविध नागरी प्रश्न, राज्यातील अन्य महानगरपालिकांमध्ये प्रशासक राजवटीत खर्चात झालेली भरमसाठ वाढ, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अरबी समुद्रातील स्मारकाच्या रखडलेल्या कामास गती देणे, राज्यातील अनेक विभागात उघड झालेले भ्रष्टाचार, प्रत्येक विभागात बदली, नियुक्ती यात होत असलेला गैरव्यवहार, मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन विभागाच्या जागेवरील पात्र असणाऱ्या आणि न्यायालयाच्या आदेशानुसार ज्यांनी शासनाकडे ७ हजार रुपये भरलेले आहेत अशा १२,८४९ झोपडपट्टीवासी तसेच २०११ च्या शासननिर्णयानुसार वास्तव्याचा अधिकार प्राप्त असलेल्या व सॅटेलाइट सर्व्हेनुसार वास्तव्याचा अधिकार पात्र असणाऱ्या एकुण २५ हजार घरांना संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या बाजुला असणा-या जमिनी अधिगृहीत करुन त्याठिकाणी कायमस्वरुपी घरे बांधून देण्याबाबत होत असलेला विलंब. तथापि याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**बारा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री. अमिन पटेल, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईमध्ये नोंदणीकृत सरकारी तसेच खाजगी रुग्णालयांची संख्या १३०० हून अधिक असणे, या रुग्णालयांव्यतिरिक्त अनेक बेकायदा रुग्णालये मुंबईमध्ये आढळून येणे, बेकायदा रुग्णालयांचे सर्वाधिक प्रमाण मानखुर्द, गोवंडी, शिवाजीनगर परिसरात असणे, काही रुग्णालये अतिशय चिंचोळ्या गल्लीत असून दुर्दैवाने आगीची घटना घडल्यास तेथे आगीचे बंब पोहोचण्यास अडथळे निर्माण होणे, मुंबईमधील अनेक खाजगी, सार्वजनिक रुग्णालये आणि नर्सिंग होम यांचे फायर ऑडीट न होणे, या रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा असणे, अनेक वैद्यकीय चाचण्या बाहेरुन करुन घेण्यावर या रुग्णालयांचा भर असणे, या रुग्णालयांमध्ये सोयीसुविधांचा अभाव असणे, त्यामुळे रुग्णांच्या जीवास धोका निर्माण होणे, खर्चिक वैद्यकीय सेवेमुळे रुग्ण खचून जाणे, रुग्णालयांना आग लागण्याचे प्रमाण वाढत असणे, विनापरवाना खाजगी रुग्णालये, नर्सिंग होम राजरोसपणे चालू असणे, या रुग्णालयांवर कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी रुग्णांची होणारी आर्थिक छळवणूक व त्यांच्या नातेवाईकांमध्ये पसरत असलेला असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

**(२) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील आरे वसाहतीमधील २७ आदिवासी पाडयांना जोडणाऱ्या जवळपास ४५ कि.मी. लांबीच्या अंतर्गत रस्त्यांची दुरूस्ती गेल्या कित्येक वर्षांपासून करण्यात आलेली नसणे, सदरहू रस्त्यांच्या दुरूस्तीकरिता एम.डी.आर अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२० पासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदने सादर केलेली असणे, देखभाल दुरूस्तीअभावी या रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरवस्था झालेली असून या रस्त्यांवर पथदिवेही नसल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, पथदिव्यांअभावी असणाऱ्या अंधारामुळे मागील काही महिन्यात या ठिकाणी बिबट्याचा संचार वाढला असून बिबट्याने हल्ला केल्याच्या ७-८ घटना घडलेल्या असणे, यात (१) ४ ऑक्टोबर, २०२२ हिमांशू अवधेश यादव (वय ५ वर्ष) आदर्श नगर, (२) २४ ऑक्टोबर, २०२२ कुमारी इकीता लोट, युनिट नं. १५ (वय १.५ वर्ष - मयत), (३) ११ नोव्हेंबर, २०२२ श्रीमती संगीता गुरव, आदर्श नगर. या प्रकरणी पथदिवे सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर तसेच डिसेंबर, २०२१ तसेच माहे जुलै व नोव्हेंबर, २०२२

मध्ये वा त्या दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांना निवेदनही दिलेले असणे, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे व पथदिवे बंद असल्यामुळे या भागातील आदिवासी नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत, रात्री अपरात्री वैद्यकीय सुविधेसाठी जाण्याकरिता अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून वेळप्रसंगी नागरिकांना वेळेवर उपचार न मिळाल्याने जीवही गमवावा लागत असणे, सदरहू रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीअभावी व पथदिवे बंद असल्याने स्थानिक आदिवासी नागरिकांना होत असलेला त्रास व या रस्त्यांच्या दुरूस्तीकरिता प्राप्त होणारा निधी लक्षात घेता सदरहू रस्ते हे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत तसेच रस्त्यांच्या विकास व दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली असणे, परंतू अद्यापही या प्रकरणी शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, केवळ रस्त्यांच्या दुरूस्तीच्या नावाखाली तुटपुंज्या निधीची उपलब्धता शासनाकडून करण्यात येत असल्याने या रस्त्यांच्या दुरवस्थेत दिवसेंदिवस वाढ होत असणे, सदरहू रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे शक्य नसल्यास, सदरहू रस्त्यांची मालकी ही शासनाकडेच ठेवून केवळ देखभाल दुरूस्तीकरिता सदरहू रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून मागणी करण्यात येणे, आरे क्षेत्रामधील अंतर्गत रस्त्यांच्या सिमेंट कॉँक्रीटीकरणाच्या कामांकरिता १७३ कोटीच्या निधीची आवश्यकता असतांना अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणासाठी रुपये ४८ कोटी खर्चाच्या प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागाव्दारे तांत्रिक मान्यता देण्यात आली असणे, परंतु येत्या दोन वर्षात मुंबईतील रस्त्यांचे सिमेंट कॉँक्रिटीकरण करण्यासाठी मुंबई महापालिकेने सहा हजार कोटीचे बजेट केलेले असणे, मुंबईच्या रस्त्याकरिता शासन ६०० हजार कोटीच्या निधीची तरतुद करत असतांना आरे क्षेत्रातील आदिवासी पाडयांमधील अंतर्गत रस्त्यांच्या कॉक्रिटीकरणाकरिता १७३ कोटीच्या निधीची तरतूद करण्यास असमर्थता दर्शविणे, आरे क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यांच्या कॉक्रिटीकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी सातत्याने पाठपुरावा करुनही शासन स्तरावर कोणतीच दखल घेतली जात नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक ३ व ४)**

**(३) श्री. अस्लम शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई उपनगरातील मालाड (प.) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दिनांक १८ मे, १९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू केलेली असणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात आलेली असणे,

त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात आलेली असणे, परंतु सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळाला असून २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी होऊ शकलेले नसणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पन्नधारक असणे, अनेक गाळेधारकांकडे पैसे नसल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळेधारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करून निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. कुणाल पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"धुळे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी शेती पंपासाठी विद्युत कनेक्शन मिळवण्यासाठी पैसे भरलेले असले, तरी अद्यापपावेतो विद्युत कनेक्शन देण्यात आलेले नसणे, वीज पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी शेतकऱ्यांकडून सिंगल फेज ट्रान्सफार्मरची मागणी करण्यात आलेली असणे, नवीन वस्त्यांमध्ये व आदिवासी वस्तीत इलेक्ट्रिक पोलचे कामे प्रलंबित असणे, शेतीपंपाचे नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर वेळेवर बदलून मिळत नसणे, ग्रामीण भागात इलेक्ट्रिक पोलच्या तारा नादुरुस्त असून त्या बदलून नवीन पोलची मागणी शेतकरी बांधवांकडून करण्यात येणे, ग्रामपंचायतीने नळ पाणीपुरवठा योजनेसाठी नवीन ट्रान्सफॉर्मरची मागणी होणे, वाढीव वीज बिलाबाबत ग्राहकांच्या अनेक तक्रारी असणे, ग्रामीण भागात, शेती शिवारात विद्युत तारा लोंबकळलेल्या अवस्थेत असणे, त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होणे, ग्रामीण भागातील सामान्य जनता व शेतकरी बांधवांच्या अनेक समस्या व विविध मागण्या असून या मागण्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, धुळे तालुक्यातील उर्जा विषयी समस्यामार्गी लावण्यासाठी शासनाने जास्तीचा निधी तातडीने मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"दिनांक ३० जून, २०२३ रोजी नागपूरहून पुण्याकडे येणारी विदर्भ ट्रॅव्हल्सच्या बसचा समृध्दी महामार्गावर पिंपळखुटा गावानजिक भीषण अपघात होऊन २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू होणे, अपघातातील वाहन चालकाने मद्यपान केलेले असणे, मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्या सार्वजनिक व खाजगी वाहन चालकांवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी शासनाने महामार्गाच्या प्रवेशव्दारावर श्वास विश्लेषक यंत्र (Breath-Analyzer) लागू करणे, ड्रायव्हर फास्ट लेनमध्ये बस चालवून लेन नियमांचे उल्लंघन करणे, अशा चालकांना दंड करुन कठोर

कारवाई करण्याची आवश्यकता, अपघात कमी करण्यासाठी लेन शिस्त सुनिश्चित करणे, वाहन चालकांची नियमित फिटनेस व वैद्यकीय चाचण्या घेण्याची आवश्यकता, समृध्दी महामार्गाच्या रचनेतील दोषही अधोरेखित झाला असणे, भविष्यात होणारे अपघात टाळण्यासाठी शासनाने या समस्येची सखोल चौकशी करुन त्यावर उपाययोजना करण्याची आवश्यकता, महामार्गावरील कोणत्याही डिझाइनचे योग्य अभियांत्रिकी मूल्यांकन करणे, महामार्गावर टायर फुटण्याच्या वारंवार घटना घडत असल्यामुळे रस्त्यांची स्थिती व निराकरण करण्यासाठी महामार्गावरील नियमित देखभाल तपासणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २६ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा